# पोलीस आयुक्तालय, अमरावती

## ई-पोलीस पत्रीका

दि.१६/०४/२०२१ अनु.क्र.६९

### (अमरावती शहर पोलीसांची २०२१ ची उद्दिष्टे)

. जागरुक व तत्पर पोलीस

. नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.

. उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.

. महिला, मुले व जेष्ठ नागरिकांची सुरक्षा.

. जातीय सलोखा वाढविणे.

. संघटीत गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.

. रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/ सुरक्षा.

. पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.

. आरोपी पोलीसांच्या ताब्यातून पळून जाऊ नये.

. सुरक्षित व सुखकर अमरावती हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.जा.क्र.पोआअ/पशा-१/रजा पोलीस अधिकारी/२७२३/२०२१ अम. दि. १५.०४.२०२१**

**आदेश**

खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत किरकोळ /अर्जित रजा मंजुर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुकीच ठिकाण पो.स्टे. | रजा मंजुरीचा प्रकार | रजा मंजुरीचा कालावधी | कार्यभार सांभाळणार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोनि. निलीमा आरज | विशेष शाखा | किरकोळ रजा | दि.१६.०४.२०२१ एक दिवस | पोउपनि. रामभाऊ जावरे, विशा. |
| ०२ | पोनि. विजय दिघे | वलगांव | पदग्रहण अवधी (अर्जित रजा) | दि.१९.०४.२०२१ ते २६.०४.२०२१ पर्यंत ८ दिवस | |
| ०३ | पोउपनि. रामभाऊ जावरे | विशेष शाखा | अर्जित रजा | दि. २२.०४.२०२१ ते ०६.०५.२०२१ पर्यंत १५ दिवस | |

## वेतन/वेतनवाढ/वेतन निश्चीती/सुधारीत वेतन निश्चिती

## वेतन

**१.जा.क्र.पोआअ/विचौ-२/पगार बंद/पोशि-१४०१ धुर्वे/२७५२/२०२१ अम. दि. १६.०४.२०२१**

**आदेश**

पोशि विजय धुर्वे / १४०१, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर आपण दिनांक २२.०३.२०२१ पासुन वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता आ पावेतो कर्तव्यावर अनाधिकृतपणे गैरहजर असुन आपणास कर्तव्यावर हजर होणेबाबत पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथून नोटीस बजावणी करुण सुध्दा अदयाप पावेतो कर्तव्यावर हजर झालेले नाही.

तरी पोशि विजय धुर्वे/१४०१, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे वेतन **(वेतन)** पुढील आदेशापर्यंत बंद करण्यांत येत आहे.

# शिक्षा/निलंबन/पुनःस्थापीत/बक्षिस/नाव कमी करणे

## शिक्षा

**१.जा.क्र.पोआअ/विचौ-२/कसुरीअंतिमआदेश/पोशि-गजभिये-१६९१/२५८९/२०२१ दि.०८.०४.२०२१**

कसुरदाराचे नाव :- पोशि विशाल गजभिये / १६९१, नेमणुक पो.स्टे. नागपुरी गेट (नियंत्रण कक्ष), अमरावती शहर

थोडक्यांत कसुर :-

पोशि. विशाल गजभिये / १६९१, नेमणुक पोलीस स्टेशन (नियंत्रण कक्ष) , अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन मा. महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे पोलीस आयुक्तालय अमरावती शहर येथुन जिल्हा नांदेड करीता २०० पोलीस अंमलदार ग्रामपंचायत निवडणुक बंदोबस्त कामी पाठविण्याबाबत आदेश प्राप्त झाली असता त्यामध्ये बंदोबस्त कामी नमुद पोलीस अमंलदार यांना दि. १३.०१.२०२१ रोजी ०८.०० पोलीस मुख्यालय येथुन एकत्रित करुन एस.टीं .बस वाहनाणे रवाना करण्यांत आले असता आपण त्यावेळी गैरहजर असल्याचे निदर्शनास आल्याने आपल्या बाबत माहिती घेतली असता आपण नियत्रण कक्ष वायरलेस विभाग येथे पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथुन डयुअी पासवर असुन आपणास नांदेड येथे बंदोबस्त कामी जाण्याचे माहिती पडल्याने आपण दि. ११.०१०.२०२१ रोजी आजारी रजेवर रवाना होवून दि. १६.०१.२०२१ रोजी परत आले बाबत वायरलेस विभाग येथील दैनंदिन डयुटी चार्ट वर नोंद आहे. परंतु आपण आजारी रजेवर जाणे व परत येणे बाबत नियंत्रण कक्ष येथील स्टेशन डायरी येथे कोणतीही नोंद नाही. आपण नांदेड येथे ग्रामपंचायत निवडणुक बंदोबस्त कामी जावे लागत असल्याने कर्तव्य टाळण्याचे उददेशाने वेळेवर आजारी रजेवर गेल्याचे दिसुन येते.

अशा प्रकारे आपण शिस्तबध्द पोलीस खात्यात नेमणुकीस असुन सुध्दा आपल्या कर्तव्याप्रती बेशिस्तपणा केल्याचे निदर्शनास आले आहे. शिक्षेबाबत अंतिम आदेश खालील प्रमाणे पारीत करण्यांत येत आहे.

अंतिम आदेश

उपरोक्त नमुद कसुरदार यंना देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता ) रोखण्याची शिक्षा देण्यांत येत आहे.

**२.जा.क्र. पोआअ/विचौ-२/कसुरी/कश्रेलि-कांबळे/२६८१/२०२१ अम. दि. १५.०४.२०२१**

दोषारोप :-

कनिष्ठ श्रेणी लिपीक श्री. अनिल कांबळे हे पत्रव्यवहार शाखा मध्ये मोटार परिवहन विभाग येथील शासकीय वाहनाचे कामकाज पाहत असुन कश्रेलि अनिल कांबळे पत्रव्यवहार शाखा पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन कार्यालयीन टिपणी अंतिम आदेशार्थ सादर केलेल्या खालील नमुद टिपणीचे अवलोकन केले असता सदर टिपणी ही दि. ०७.१२.२०२०, दि. ०८.१२.२०२१, दि. ०८.१२.२०२० व दि. ०९.१२.२०२० रोजी सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांचे कडुन अभिप्राय व स्वाक्षरी होवून आल्याने दि. १०.१२.२०२० रोजी टिपणी सादर केरणे आवश्यक असतांना विलंबाने दि. ३१.१२.२०२० रोजी सादर केलेली आहे. यावरुन असे दिसुन येते

की, आपण कर्तव्याप्रती गंभीर नसुन कार्यालयीन कामकाजामध्ये अत्यंत निष्काळणीपणा काम करीता आहे. अशा प्रारे आपण कर्तव्यात दिरंगाई करुन बेजबाबदारपणाचे वर्तन केले आहे. शिक्षेबाबत खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यां येत आहे.

अंतिम आदेश

श्री. अनिल कांबळे, पत्रव्यवहार शाखा, पोलीस आयुक्त, कार्यालय अमरावती शहर यांना **ठपका ठेवणे** हि शिक्षा देण्यांत येत आहे.

**३.जा.क्र. पोआअ/विचौ-२/कसुरी/कश्रेलि-कांबळे/२६८०/२०२१ अम. दि. १५.०४.२०२१**

दोषारोप :-

कनिष्ठ श्रेणी लिपीक श्री. अनिल कांबळे हे पत्रव्यवहार शाखा मध्ये मोटार परिवहन विभाग येथील शासकीय वाहनाचे कामकाज पाहत असुन हे दि. ३०.०३.२०२० रोजी कोणती पुर्व सुचना न देता शाखा प्रमुख लिपीक यांचे मौखीक आदेशान्वये कश्रेलि अनिल कांबळे हे कर्तव्यावर गैरहजर असुन यांना वारंवार कार्यालयात हजर राहीणे बाबत फोन व्दारे सुचना देवून तसेच समज पत्र देवून सुध्दा कर्तव्यावर गैरहजर राहत असुन आपल्या कडे शासकीय वाहनाचे देयके मोटार परिवहन विभाग, अमरावती शहर येथील शासकीय वाहणाचे दुरुस्ती , डिझेल, पेट्रोल, वाहणाचे सुटेभाग खरेदी व इतर देयके मंजुरीबाबतचे कामकाज असुन सध्या मार्च ऐडींग असल्याने सदरचे देयके चालु वर्षात दि. ३१.०३.२०२१ पर्यंत मंजुरी करुन कोषागार येथे सादर करणे गरजेचे असुन आपण आपल्या कर्तव्यावर गैरहजर राहत असुन हि बाब कार्यालयाचे शिस्तीत धरुन नसल्याने आपण अतिमहत्वाचे कार्यसनावर कार्यरत असुन आपल्या कामकाजाबाबत हलगर्जीपणा व बेजबाबदारपणा करयाचे कसुरी करीत आहे. असे दिसुन येत असल्याने केलेल्या कर्तव्याप्रति उदासिनता दिसुन येते. त्यामुळे आपण कर्तव्यात गंभीर कसुर केल्याचे प्रथम दर्शनी दिसुन आले आहे.

आपणास ज्ञापनाव्दारे कळविण्यांत आले होते की, आपल्या विरुध्द कारवाई करण्यांचे ठरविले आहे. आपण केलेल्या शिक्षेबाबत अंतिम आदेश पारीत करण्यांत येत आहे.

**अंतिम आदेश**

श्री. अनिल कांबळे, पत्रव्यवहार शाखा पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांना **ठपका ठेवणे** हि शिक्षा देण्यांत येत आहे.

**४.जा.क्र.कई-१/वा.प्र.१६/मतका डाटा/टी-२४/४३३/२०२१ नागपुर दि. ३०.०३.२०२१**

विषय :- वाशिम व्ही-सॅट स्थानाकाने दि. २९.०९.२०१८ रोजी प्रक्षेपीत केलेला बिनतारी संदेश अमरावती व्ही-सॅट स्थानकाने स्थानकाने ग्रहण न केलेने वेळेत कार्यवाही न घेतलेने कसुरदार यांना योग्य ते शासन होणेकरीता अंतिम आदेश बाबत.

थोडक्यात कसुरी :-

खालील नमुद कर्मचारी यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेली कर्तव्यावर असतांना नेमुण दिलेल्या कर्तव्यात कसुरी केलेली आहे.

१. पोलीस निरीक्षक बि.सं. मध्यवर्ती तपासणी कार्यालय पुणे यांनी दि. २९.०९.२०१८ रोजीचे लॉग व ट्रॅफिक चेक केले असता तपासणीत असे आढळुन आले की, दि. २९.०९.२०१८ रोजी २१.२० वाजता वाशिम व्ही-सॅट स्थानकाने अमरावती व्ही सॅट स्थानकास प्रक्षेपीत केलेले बि.सं. क्रमांक १२४ ते १२६ हे प्राप्त झाल्याची अमरावी व्ही-सॅट स्थानक अमरावती यांचे लॉगमध्ये नोंद आहे. परंतु बि.सं. क्र. १२६ हा संबंधीतांना दिला गेलेला नाही. त्याच प्रमाणे दि. ३०.०९.२०१८ रोजी वाशिम स्थानकाने पाठविलेला समरी क्युएनके मध्ये सदर संदेश पाठविले बाबत नमुद केलेले असतांना अमरावती येथील कर्तव्यावरील म.पोहवा/बियंचा व्ही.एं.आढे, प्रभारी पोहवा/बियंचा श्री. सोलव (स्थानक प्रमुख) व तपासणी पोहवा./बियंचा श्री.व्ही.पी.सोनकुसळे यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याने सदरचा संदेश प्राप्तकर्त्यास अखेरपर्यंत प्राप्त झालेला नाही.

कसुरदाराचे जबाबाचे अवलोकन व पडताळणी केली असता सादर केलेला जबाब/खुलासा संयुक्तीक वाटत नाही. त्यांनी आपले कर्तव्यात केलेल्या चुकीबदल निष्काळजीपणा केल्याचे दिसुन येते. करतीा कर्तव्यावरील मपोहवा/बियंचा श्रीमती व्ही.ए.आढे पोहवा/बियंचा श्री.व्ही.डी.सोलव (स्थानक प्रमुख) व तपासणी पोहवा/बियंचा श्री.व्ही.पी.सोनकुसळे हे दोषी असल्याचे आढळुन आले असुन सदरील बाब बिनतारी संदेश कार्यप्रणालीशी विसंगत आहे. त्यामुळे त्यांनी केलेल्या कसुरीबदल खालील शिक्षा देण्यांत येते.

**आदेश**

मी. प्र.तु.सोनवणे पोलीस अधिक्षक बिनतारी संदेश पुर्व विभाग, नागपुर पोलीस नियमावलीभाग-१ तरतुदी नुसार अधिकारचा वापर करुन केलेल्या कसुरीमुळे बिनतारी संदेश कार्याप्रणालीचा भंग केल्याचे दोषी आढळुन आले असल्याने कर्तव्यावरील मपोहवा. /बियंचा श्रीमती. व्ही.ए.आढे पोहवा/बियंचा श्री.व्ही.डी. सोलवा (स्थानक प्रमुख) व पोहवा. /बियंचा श्री. व्ही.पी.सोनकुसळे यांना **ताकीद** ही शिक्षा देण्यांत येत आहे.

**( रमेश टाले )**
प्र.सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रत, पोलीस उपायुक्त (मुख्या.)/ पत्रव्यवहार शाखा/ सेवापट नोदंणी लिपीक, आस्थापना शाखा/ सीसीटीएनएस कक्ष, यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीकरीता.